शुक्रवार, ११ जून २००४ ■ महाराष्ट्र टाइम्स

मुंबई टाइम्स

ठाणे विभाग



रिअल गुड या भारतातील पहिल्या फॅशन रिटेल संकल्पनेविषयी सांगताहेत गोदरेज अॅग्रोवेटचे जनरल मॅनेजर, प्रगती फास्टमध्ये... पान २



लेस्बियनिज्म म्हणजे नेमकं काय? समज, गैरसमज आणि मुलींचं मन...जस्ट टीनमध्ये... पान ३



आणखी एक पोलिस कथा या पत्नीकडे आनमध्ये काही बसल्याने मधुर भांडारकर यांच्याकडून अपेक्षाभंग झाल्याचं दुःख सहन करावं लागतं... पान ६

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल डोंबिवलीतही

सुनील जावडेकर

**डोंबिवली :** या शहराची ओळख राज्याची वैद्यकीय राजधानी व्हावी, यासाठी डोंबिवलीतील ओम हॉस्पिटल आणि साईश्रद्धा हॉस्पिटलचे डॉ. शरद धाकतोडे आणि डॉ. वंदना धाकतोडे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू केलं आहे. ओम हॉस्पिटलला नुकतंच आयएसओ ९००१ प्रमाणपत्र मिळालं आहे. आयएसओ मानांकन मिळवणारं ओम हॉस्पिटल हे शहरातील पहिलंच हॉस्पिटल आहे.

मोठ्या अवघड शस्त्रक्रियांसाठी कल्याण-डोंबिवलीकरांना मुंबईला धाव घ्यावी लागते. आता मात्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे आणि अवघड शस्त्रक्रिया करण्याची क्षमता असलेलं, संपूर्ण स्टेनलेस स्टीलचं ऑपरेशन थिएटर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचं खास वैशिष्ट्य राहणार आहे. त्याचप्रमाणे अत्याधुनिक, शस्त्रक्रियेला तसंच शल्यचिकित्सेला आवश्यक व अनुकूल अशा साधनसुविधा इथे उपलब्ध असतील. सध्या अशा प्रकारच्या सुविधा या फक्त मुंबईतील ब्रीच कॅण्डी हॉस्पिटल व एशियन हार्ट इन्स्टिट्यूट इथे उपलब्ध आहेत.

लॅमिनार एअरफ्लो असलेले हेपा फिल्टर यामुळे संपूर्ण निर्जंतुक पर्यावरण राखलं जातं. ही सुविधा हृदयरोग, गुडघा तसंच नितंब यांच्या पुनर्रचनेसाठी कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ओअॅसिस हॉस्पिटलची खास वैशिष्ट्यं असणाऱ्या अन्य तेरा प्रकारच्या सुविधा ओम आणि साईश्रद्धा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

तीन शल्यचिकित्सा व शस्त्रक्रियागृह, चार कन्सल्टिंग रूम, ३५ बेड्स व तेवीस विशेष विभाग उपलब्ध आहेत. या सर्वांची देखभाल करण्यासाठी व दर्जेदार आणि तत्पर सेवा देण्यासाठी विविध वैद्यकीय शाखांमधील ३० विशेष तज्ज्ञ हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे याचा फायदा डोंबिवलीप्रमाणेच कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी या परिसरातील रुग्णांनाही मिळणार आहे.

सर्व विमा कंपन्यांच्या कॅशलेस मेडिक्लेम व थर्डपार्टी एन्शुरन्स योजनांच्या पॅनलवर ही दोन्ही हॉस्पिटल्स असल्यामुळे त्याचाही फायदा गरजवंतांना घेता येणार आहे. लवकरच विविध व्याधींवरचे निदान केंद्र ओम हॉस्पिटलच्या कॉमर्स सेंटरमध्ये तळमजल्यावर सुरू करण्यात येणार असल्याचं डॉक्टर धाकतोडे यांनी सांगितलं.

संपर्क - ओम हॉस्पिटल, कॉमर्स सेंटर, टंडन रोड, रामनगर, डोंबिवली (पूर्व). टेलिफोन - २८६३६९२, २८६३९५५.

...रत, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१ येथे प्रकाशित केले व द टाइम्स ऑफ इंडिया सबर्बन प्रेस, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेजवळ, आकुर्ली...
...६३५३६३६, २२७३३६३६), फॅक्स क्रमांक : ०२२ - २२७३११७५, ०२२ - २२७३११४४. सर्वाधिकार सुरक्षित. प्रकाशकांच्या लेखी अनुम...